# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-१६९ दिनांक - ०२/०५/२०२४

## तक्रारदार यांचे खात्यातुन कपात झालेले २,३९,११९/- रक्कम तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नायगांव परीसरात राहणारे श्री.पाटील हे त्यांचे मोबाईल मधील बँक ॲपमधुन शिल्लक रक्कमेची पाहणी करीत असताना त्यांचे बँक खात्यातुन २,३९,११९/- रु कपात झाल्याचे लक्षात आले. तक्रारदार यांचे खात्यातुन कपात झालेल्या रक्कमेच्या तक्रारीकरीता त्यांनी ऑनलाईन व्यवहार करीत असताना २,३९,११९/- रु **ची फसवणुक झाल्याबाबत सायबर पोलीस ठाणे येथे आवक क्र.१०६९/२०२४ दिनांक ०१/०५/२०२४ रोजी तक्रारी अर्ज दिला होता.**

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक — १०६९-बी/२०२४ दि. ०१/०५/२०२४)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे खात्यातुन झालेले व्यवहार तात्काळ रोखण्याकरीता तसेच त्यांची रक्कम मुळ खात्यावर जमा होणेकरीता संबंधीत बँकेला पत्रव्यवहार करण्याबाबत कळविण्यात आले. सायबर पोलीस ठाणेकडुन करण्यात आलेल्या तात्काळ पत्रव्यवहाराचे अनुषंगाने **तक्रारदार यांची फसवणुक झालेली २,३९,११९/- रु तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेली आहे.**

### अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- **ऑनलाईन व्यवहार करीत असताना अगर इतर खात्यात रक्कम वर्ग करीत असताना बँक खात्याची खात्री केल्याशिवाय व्यवहार करु नये.**
- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करु नये.**
- **अनोळखी लिंक, ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/ प्रसाद शेनोळकर, मपोअं/१३०८७ अमिना पठाण, मपोअं/१६१०६ सुवर्णा माळी, पोअं/राहुल बन, मपोहवा/१२००७ माधुरी धिंडे, यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

----0000----